# भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६८/२०२५ दि. १३/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, भिवंडी शहरात दि. १६/०८/२०२५ रोजी **'गोपाळकाला'** सण साजरा होणार आहे. सणानिमित्त भिवंडी शहरात मुख्य रस्त्यावर कॉटरगेट जकात नाका, स्व. आनंद दिघे चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक, बी. एन. एन. कॉलेज, धामणकर नाका या ठिकाणी मुख्य दहिहंडी बांधली जाणार आहे. या दहिहंडी करीता मा. मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच केंद्रीय मंत्री, भारत सरकार हे उपस्थित राहणार आहेत. तसेच नमूद दहिहंडी पाहण्यासाठी भिवंडी शहरातील तसेच आजूबाजूचे खेडेगावातील लोक मोठया संख्येने येत असतात. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** **१)** रांजनोली नाक्या कडुन भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड व मध्यम व हलकी वाहनांना तसेच एस.टी., के.डी.एम.टी.,टी.एम.टी. बसेस यांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची जड, मध्यम व हलकी वाहने ही रांजनोली नाका येथे वळसा घेवुन मुंबई – नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथुन अंजुरफाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथुन ओवळीगांव, ताडाळी जकातनाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

ब) एस.टी./के.डी.एम.टी, टी.एम.टी. बसेस रांजनोली नाका येथे प्रवाशी उतरवतील व तेथुनच प्रवाशी भरून इच्छित स्थळी जातील व इतर वाहने ही राजणोली नाका येथुनच वळसा घेवुन परत जातील.

**प्रवेश बंद –** २) **अ)** वाडा रोड मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना **अंबाडी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**ब)** वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारोळफाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरची जड, अवजड वाहने अंबाडीनाका येथुनच राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालीका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** तसेच हलकी वाहने पारोळफाटा येथुन उजवीकडे वळुण खोणीगांव, तळवली फाटा, कांबारोड या पर्यायी मार्गाने वसईरोड येथुन डावीकडे वळण घेवुन कारीवली मार्गे इच्छित स्थळी जातील अथवा विश्वभारती फाटा येथुनच डावीकडे वळुन गोरसईगांव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **३)** वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना व एस.टी.बसेसना **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका** व **चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरची सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवुन पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छीत स्थळी जातील.

**ब)** तसेच एस.टी. बसेस या आपले प्रवाशी चाविंद्रा जकातनाका या ठिकाणी उतरवतील व तेथुनच प्रवाशी घेवुन बस वळवुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **४) अ)** मुंबई ठाणे कडुन जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

ब) तसेच हलकी वाहने (कार,रिक्षा,दुचाकी वाहने), टी.एम.टी./एस.टी.बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरची जड वाहने वसई रोड मार्गाने कारीवली जकातनाका व विटभट्टीमार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** टी.एम.टी./एस.टी.चे प्रवाशी नारपोली पो.स्टे. याठिकाणी उतरतील व तेथुनच प्रवाशी घेवुन परत जातील आणि हलकी वाहने ही देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) खाडीपार कडून भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **अजयनगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अजयनगर–गाजेंगी हॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** **दिनांक १६/०८/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० ते २२:०० वाजेपावेतो कल्याण नाका – बागेफिरदोस – छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास सक्त मनाई आहे.**

सदर अधिसूचना **दि. १६/०८/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० ते २२:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण/पालघर.

**प्रत :–** पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. भिवंडी–निजामपूर शहराच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.